Reading Comprehension

## मीठ

आपल्या जेवणात मीठ नसेल तर जेवण बेचव लागते. भाजी, आमटी काहीही करा. त्यात अनेक मसाले घाला, पण त्यात मीठ अजिबात नसेल तर तो पदार्थ अतिशय बेचव लागतो. मीठ जास्त झाले तर भाजी खारट होते. खारट भाजी कुणालाच आवडत नाही. मीठ समुद्राच्या पाण्यापासून तयार होते. मिठामुळे लोणचे टिकते, मिठात घालून ठेवलेले मासे टिकतात. मिठाला पाणी लागले की ते विरघळते.

प्रश्न १: भाजी व आमटीला चव कशामुळे येते?
प्रश्न २: भाजीत मीठ जास्त झाले तर काय होतं?
प्रश्न ३: मिठाचे दोन उपयोग सांगा ?
प्रश्न ४: मीठ कशात विरघळते ?
प्रश्न ५: मीठ कशापासून तयार होते?

Reading Comprehension

## <u>एक पूल आणि दोन बकऱ्या</u>

एका गावात एका नदीवर एक लाकडी पूल होता. त्या पुलावरून एकावेळला एकच जण किवा जानवर जाऊ शके. एकदा दोन कोल्हे दोन्ही बाजुनी येऊन पुलावर मधोमध भेटले व भांडू लागले. शेवटी मारामारी करता करता दोन्ही कोल्हे नदीत पडले.

थोड्या वेळाने एका काठावरून एक बकरी पुलावरून जायला निघाली. दुसऱ्या बाजुने पण एक बकरी आली. दोन्ही बकऱ्या मधोमध आल्या. मग एक बकरी हळूच खाली बसली. तिच्या अंगावरून दुसरी बकरी पलिकडे गेली. अशा रीतीने दोन्ही बकऱ्यांनी तो पूल पार केला.

प्रश्न १ : नदीच्या एका काठावरून दुसऱ्या काठावर जायला काय होते ?
प्रश्न २ : कोल्हे पाण्यात का पडले?
प्रश्न ३ : एक बकरी खाली का बसली?
प्रश्न ४ : पुलावर कोण-कोण भेटले?
प्रश्न ५ : दोन्ही बकऱ्या एकाच काठावरून आल्या की वेगवेगळया काठावरून आल्या?

Listening Comprehension

**<u>मी पावसात भिजतो</u>**

आकाशात काळे ढग आले. एक थेंब पडला, मग दुसरा आणि मग जोराचा पाऊस सुरू झाला. मी शाळेतून घरी जात होतो. मी छत्री आणली नव्हती. जवळ दप्तर होते, दप्तरात पुस्तके, वह्या होत्या. एका झाडाखाली मी उभा राहिलो, पण पाऊस थांबेना. रस्त्यात आजीचे घर होते. मी घरी न जाता आजीच्या घरी गेलो. मी आत गेलो, आजीने माझे केस पुसले. आजीने आईला फोन करून मी येथे आहे असे सांगितले. काम संपल्यावर आई बाबा गाडी घेऊन आले. आम्ही आजीकडेच जेवलो व रात्री घरी गेलो.

प्रश्न १ : मी काय आणले असते तर भिजलो नसतो?
प्रश्न २ : शाळेतून येताना माझ्याजवळ काय काय होते?
प्रश्न ३ : मी घरी न जाता आजीकडे का गेलो?
प्रश्न ४ : मी आजीकडे गेलो तेंव्हा आजीने काय काय केले?
प्रश्न ५ : मी कोणाबरोबर घरी गेलो?

**Listening Comprehension**

## <u>बंटी कुत्र्याची शेपटी</u>

एकदा बंटी कुत्र्याला वाटले की आपली शेपटी तोंडात धरावी. त्याने खूप प्रयत्न केला. तो पळाला की शेपटी पळत असे, तो थांबला की शेपटी थांबत असे, तो वळला की शेपटी वळत असे. पण शेपटीचे टोक त्याला तोंडात धरता येईना. तेवढ्यात त्याच्या शेपटीवर एक मोठी माशी बसली. तिला पकडायला तो मागे वळला पण माशी उडून गेली. बंटी पुढे पळाला तर माशी परत त्याच्या शेपटीवर बसली. बंटी अगदी दमून गेला आणि खाली बसला. मान वळवून त्याने माशी पकडायचा प्रयत्न केला, माशी उडाली पण शेवटी त्याला शेपटी पकडता आली.

प्रश्न १ : बंटीने काय करायचा खूप प्रयत्न केला?
प्रश्न २ : बंटी पळाला व थांबला की काय होत असे?
प्रश्न ३ : माशी कशावर बसत असे?
प्रश्न ४ : बंटीला काय करता आले नाही?
प्रश्न ५ : बंटीने काय केले की शेपटी पकडता आली ?